# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

**आयएस्ओ ९००१ : २००८ मानांकित संस्था**

**१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.**

## कृषी विद्यापीठातील पदवी प्रवेश २०१७-१८

महाराष्ट्र राज्यातील महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी व डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली या चारही कृषी विद्यापीठांतर्गत सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाकरिता खालील पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेमार्फत केंद्रीय पध्दतीने राबविण्यात येत आहे.

सर्व अभ्यासक्रमांचे माध्यम इंग्रजी भाषा राहील.

**उपलब्ध अभ्यासक्रम व प्रवेश पात्रता-**

१. किमान वयः- प्रवेश अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या तारखेपर्यंत उमेदवाराचे वय किमान १६ वर्षे असावे.

२. एकूण गुणः- पात्रता परीक्षेमध्ये (इ. १२ वी ) खुल्या उमेदवारास ५० टक्क्यांपेक्षा कमी आणि आरक्षित प्रवर्गाच्या (अ.जा. / अ.ज. / वि.जा. / भ.ज. (ब) / भ.ज. (क) / भ.ज. (ड) / इमाव / विमाव ) उमेदवारास ४० टक्क्यांपेक्षा कमी गुण नसावे.

| अ. क्र. | पदवी अभ्यासक्रम | प्रवेश पात्रता |
|---|---|---|
| १. | बी.एस्सी. (ऑनर्स) (कृषी) | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या १०+२ पध्दतीनुसार इयत्ता १२ वी (विज्ञान) उत्तीर्ण किंवा तत्सम परीक्षा, भौ.र.जी. किंवा भौ.र.ग.जी. किंवा भौ.र.ग. किंवा इंटर (कृषी) आणि इंग्रजीसह उतीर्ण. जीवशास्त्र, गणित हे विषय घेतले नसल्यास, अशा उमेदवारास अपूर्तता भरून काढण्यासाठी संबंधित विद्यापीठाने विहित केलेले अभ्यासकम पूर्ण करावे लागतील. |
| २. | बी.एस्सी. (ऑनर्स) (उद्यानविद्या) | |
| ३. | बी.एफ्.एस्सी. | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या १०+२ पध्दतीनुसार इयत्ता १२ वी (विज्ञान) उत्तीर्ण किंवा तत्सम परीक्षा, भौ.र.जी. किंवा भौ.र.ग.जी. किंवा इंटर (कृषी) आणि इंग्रजीसह उतीर्ण. गणित हा विषय घेतला नसल्यास, अशा उमेदवारास अपूर्तता भरून काढण्यासाठी संबंधित विद्यापीठाने विहित केलेले अभ्यासकम पूर्ण करावे लागतील. |
| ४. | बी.एस्सी. (ऑनर्स) (वनविद्या) | |
| ५. | बी. एस्सी. (पशुसंवर्धन) | |
| ६. | बी. टेक्. (कृषी अभियांत्रिकी) | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या १०+२ पध्दतीनुसार इयत्ता १२ वी (विज्ञान) उत्तीर्ण किंवा तत्सम परीक्षा, भौ.र.ग किंवा भौ.र.ग.जी. आणि इंग्रजीसह उतीर्ण. जीवशास्त्र हा विषय घेतला नसल्यास, अशा उमेदवारास अपूर्तता भरून काढण्यासाठी संबंधित विद्यापीठाने विहित केलेले अभ्यासकम पूर्ण करावे लागतील. |
| ७. | बी. टेक्. (अन्नतंत्रज्ञान) | |
| ८. | बी. एस्सी. (ऑनर्स) (सामाजिक विज्ञान) | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या १०+२ पध्दतीनुसार इयत्ता १२ वी (विज्ञान) उत्तीर्ण किंवा तत्सम परीक्षा, भौ.र.ग. किंवा भौ.र.ग.जी. किंवा भौ.र.जी. |

| अ. क्र. | पदवी अभ्यासक्रम | प्रवेश पात्रता |
|---|---|---|
| ९. | बी. टेक. (जैव तंत्रज्ञान) | आणि इंग्रजीसह उतीर्ण.<br>जीवशास्त्र, गणित हे विषय घेतले नसल्यास, अशा उमेदवारास अपूर्तता भरून काढण्यासाठी संबंधित विद्यापीठाने विहित केलेले अभ्यासकम पूर्ण करावे लागतील. |
| १०. | बी. एससी. (ऑनर्स) (कृषी व्यवसाय व्यवस्थापन) | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या १०+२ पध्दतीनुसार इयत्ता १२ वी (विज्ञान) उत्तीर्ण किंवा तत्सम परीक्षा, भौ.र.ग. किंवा भौ.र.ग.जी. किंवा भौ.र.जी.* किंवा इंटर (कृषी) आणि इंग्रजीसह उतीर्ण.<br>*गणित हा विषय घेतला नसल्यास, अशा उमेदवारास अपूर्तता भरून काढण्यासाठी संबंधित विद्यापीठाने विहित केलेले अभ्यासकम पूर्ण करावे लागतील. |

**(भौ.- भौतिकशास्त्र र.- रसायनशास्त्र ग.- गणित जी.- जीवशास्त्र)**

सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाची प्रवेश प्रक्रिया मे.कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., पुणे (केटीपीएल) यांचेद्वारा 'ऑनलाईन पध्दती'ने पूर्ण करण्यात येणार आहे. यासाठी प्रवेश माहिती पुस्तिका कृषी परिषद व 'केटीपीएल' च्या अनुक्रमे **www.mcaer.org** **व** **maha-agriadmission.in** या संकेतस्थळांवर दि. १५ जून,२०१७ पासून उपलब्ध करून देण्यात येईल. प्रवेशोच्छुकांनी '**maha-agriadmission.in**' या संकेतस्थळावरून प्रवेश माहिती पुस्तिका प्राप्त करून घ्यावी. प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी अवलंबवावयाची कार्यपध्दती खालीलप्रमाणे आहे.

**प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी अवलंबवावयाची कार्यपध्दती-**

- उमेदवारांने **maha-agriadmission.in** या संकेतस्थळाद्वारे **दि. १० जुलै,२०१७ पर्यंत** ऑनलाईन प्रवेश अर्ज भरावा. यानंतर प्रवेश अर्ज भरण्याची सुविधा संकेतस्थळावर उपलब्ध नसेल.
- 'ऑन लाईन' भरतांना उमेदवाराचे पासपोर्ट आकाराचे सध्याचे छायाचित्र, उमेदवाराची स्वाक्षरी, आवश्यक ती संबंधित मूळ कागदपत्रे स्कॅन करून संकेतस्थळावर अपलोड करावीत.
- **प्रवेश अर्ज किंवा कागदपत्रे हातबटवडयाने / टपालाने / कुरीअरने पाठवू नयेत.**
- प्रवेश अर्ज भरतेवेळी प्रवेश अर्जाचे शुल्क डेबिट कार्ड, क्रेडीट कार्ड किंवा नेट बँकीगद्वारे भरावे.

**प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी भरावयाचे शुल्क-**

खुल्या प्रवर्गासाठी रु. १०००/-

आरक्षित प्रवर्गासाठी रु. ५००/- (अ.जा., अ.ज., वि.जा*, भ.ज*, इ.मा.व*, वि.मा.व*.)

[*उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र अनिवार्य. ]

क्र. मकृप/शिक्षण-१/१९१७/१३६९
दिनांक- ७ जून,२०१७

**स्वाक्षरीत/-**
**महासंचालक,**
महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे